महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ❖ ११ एप्रिल २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २८३ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# शाळा व शालेय परिसरात 'शिव्यामुक्त' अभियान राबवणार - आ. किसन कथोरे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर विध्यार्थ्यामध्ये शिव्या देण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. प्राथमिक, माध्यमिक ते उच्चं माध्यमिक स्तरावर या शिव्याच्या स्वरूपात बदल होतात. केवळ विध्यार्थी नव्हे तर विध्यार्थिनी देखील शिव्या सहज बोलण्यातून देत असतात. यामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. भविष्यात हे प्रकार अधिक वाढत जाणार आहेत. हे वास्तव चित्र बदलले जावे यासाठी शाळेत व शालेय परिसरात शिव्या मुक्त अभियान राबविणार असल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली.

मुरबाड विधानसभा मतदारसंघात शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी हे अभियान प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक व उच्चं माध्यमिक शाळेत सक्तीने राबविण्यात येणार आहे. त्यासाठी छोटे छोटे रिल्स तयार करून विध्यार्थ्यामध्ये जागृती करण्यात येणार आहे. अंबरनाथ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची सभा, 11 एप्रिल रोजी घेतली जाणार आहे. हे आभियान सर्वच माध्यमाच्या शाळेत राबविण्यात येणार असल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली. सध्या येकुलता एक मुलगा अथवा मुलगी या मुळे या मुलांचे खूप लाड होतात त्यातून शिव्या देण्याचे प्रमाण वाढत आहेत. हे प्रमाण तसेच वाढत जाते त्यामुळे हेच मुले- मुली आपल्या जीवनात बोलताना संवाद साधताना सराईत पणे शिव्या चा उच्चार करतात हे सामाजिक अथवा शैक्षणिक प्रगतीचे लक्षण नाही. मुळात भारतीय संस्कृतीत शिव्याना स्थान नाही. त्यामुळे न शिकवता देखील शिव्या मुले शिकतात कशा हा देखील एक प्रश्न आहे. भविष्यात सुसंस्कृत आदर्श नागरिक तयार करणे हे शाळेचे मुख्य ध्येय असते मात्र याच शाळेत सहज वावरताना विध्यार्थी शिव्यांचा जेव्हा वापर करतात, तेव्हा सामाजिक विकासाच्या भावनेतून आणि बांधिलकीतून शाळेत व शालेय परिसर शिव्या मुक्त व्हावा या शुद्ध हेतूतून हा उपक्रम हाती घेतला असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी याबाबत माहिती देताना सागितले.

## थोडक्यात महत्वाचे

### सिंधी वसाहतींमधील जमिन पट्टे नियमित करण्यासाठी अभय योजना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर वगळून १४ जिल्हातील विस्थापित झालेल्या ३० सिंधी समाज पट्टयाला मालकी हक्क देण्यासाठी राज्य शासनाने अभय योजना लागू केली. तर शहराला यापूर्वी लागू केलेल्या विशेष अध्यादेशाचा फायदा देण्याचे काम सुरु असल्याची माहिती आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी दिली. राज्यातील उल्हासनगर मध्ये सर्वाधिक संख्येने सिंधी समाज राहत असून लोकसंख्या ३ लाखा पेक्षा जास्त आहे. उल्हासनगर विधानसभा क्षेत्रातून आजपर्यंत सिंधी समाजाचा आमदार निवडून आला आहे. तसेच अंबरनाथ व कल्याण पुर्व मतदारसंघात सिंधी समाजाचे निर्णायक मते आहेत. शहरातील अवैध बांधकामचा प्रश्न ऐरणीवर आल्यावर विस्थापिताचे शहर म्हणून खास उल्हासनगरसाठी १८ वर्षांपूर्वी बांधकामे नियमित करण्यासाठी विशेष अध्यादेश काढला. याच अध्यादेशानुसार बांधकामे नियमित करण्याची प्रक्रिया सुरु राहणार असल्याची माहिती आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी दिली आहे. दरम्यान महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत राज्यात स्थायिक झालेल्या सिंधी विस्थापितांना जमिनीचे मालकी हक्क देणे, महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियमात सुधारणा करणे, नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था स्थापन करणे अशा विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. राज्यातील सिंधी समाजातील विस्थापितांच्या जमिनींचे पट्टे नियमित करण्यासाठी विशेष अभय योजना २०२५ लागू केली जाणार आहे. या निर्णयामुळे नवी मुंबई, मुंबईतील मुलुंड (पश्चिम), सायन, नागपूरमधील जरीपटका, जळगावमधील चाळीसगाव, अमळनेर यांसारख्या राज्यभरातील ३० सिंधी वसाहतींतील जमिनीचे पट्टे नियमित करता येणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहर वगळता, २४ जानेवारी १९७३ च्या राजपत्रात जाहीर करण्यात आलेल्या ३० अधिसूचित क्षेत्रांमध्ये ही विशेष अभय योजना लागू होणार आहे. या योजनेची मुदत एक वर्ष असेल. या अंतर्गत सिंधी विस्थापितांच्या निवासी आणि व्यावसायिक जमिनींचे पट्टे नियमित केले जातील. १५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी उपयोगासाठी असलेल्या जमिनीच्या पट्टयांसाठी ५ टक्के अधिमूल्य आकारले जाईल (फ्रीहोल्डसाठी). तर व्यावसायिक प्रतिष्ठानांसाठी १० टक्के अधिमूल्य आकारले जाईल. १५०० चौरस फूटांपेक्षा अधिक क्षेत्रफळासाठी दुहेरी दराने अधिमूल्य घेतले जाईल.

# भिवंडीत शिक्षकांना सुधारित निवृत्ती वेतन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना प्रशासनाने यापूर्वीच लागू केली आहे. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे या योजनेपासून वंचीत असलेल्या पालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुद्धा ही योजना लागू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाचा फायदा ७३४ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे.

केंद्र आणि राज्य शासनाने १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी योजने ऐवजी सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. या योजनेबाबत शासन निर्णय निर्गमित होताच, भिवंडी निजामपूर शहर महापालिकेने त्याची अंमलबजावणी केली होती. या योजनेचा फायदा १८०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना झाला होता. तसेच या शासन निर्णयाची अंमलबजावणी करत ही योजना लागू करणारी भिवंडी ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली होती.

भिवंडी महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना प्रशासनाने यापूर्वीच लागू केली आहे. मात्र, पालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तांत्रिक प्रशासकीय अडचणींमुळे या योजनेपासून वंचीत होते. परंतु पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी ही अडचण दूर करत पालिका कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर पालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुद्धा ही योजना लागू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या योजनेचा फायदा ७३४ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे.

# बुलेट ट्रेनसाठी खोदलेल्या खड्डयाने घेतला चिमुरड्याचा जीव

## बेजबाबदार कंपनीवर कारवाई करा - खा. बाळ्या मामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी खोदकाम केलेल्या खड्डयात बुडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील कोपर गाव येथे सोमवारी सायंकाळी घडली आहे. या दुर्घटनेत देवव्रत जुगेश पांडेचा मृत्यू झाला आहे. या पीडित परिवाराच्या कुटुंबीयांचे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी भेट देत सांत्वन केले. यावेळी पीडित परिवाराला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीर उभे असून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देऊ, असे आश्वास दिले.



कुटुंबीयांचे सांत्वन केल्यानंतर खासदार बाळ्या मामा यांनी स्वतः दुर्घटना घडलेल्या ठिकाणी जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. यानंतर नारपोली पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दूरध्वनीवरून संपर्क साधून दुर्घटनेस जबाबदार असलेल्या कंपनी प्रशासनावर योग्य ती कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे दुर्घटना घडल्यानंतर एल. अँड. टी. कंपनीने खड्डा असलेल्या ठिकाणी बॅरिकेट व धोक्याची सूचना देणारे बॅनर लावले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाचे तालुक्यातील काम युद्ध पातळीवर सुरू आहे. यासाठी पिलर उभे करण्यासाठी खड्डे खोदले जात आहेत. कोपर गावाच्या हद्दीत अशाच एका खड्डयात पाणी साचले असताना देवव्रत जुगेश पांडे हा चौथीमध्ये शिक्षण घेणारा चिमुरडा छोटा भाऊ व मित्रांसोबत शिकवणीनंतर घरी येत असताना खड्डयात साचलेल्या पाण्यात उतरला. त्याला खड्याचा अंदाज न आल्याने त्या पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. या मृत्यूस एल. अँड टी कंपनीचा बेजबाबदारपणा कारणीभूत असून दुर्घटना घडल्याच्या दिवशी खड्डयाला कोणत्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. मात्र दुर्घटना झाल्यानंतर कंपनीने या ठिकाणी बॅरिगेट लावले होते. त्यामुळे कंपनीचा हलगर्जीपणा व चतुराई दोन्ही चव्हाट्यावर आली असून या घटनेस जबाबदार असलेल्या कंपनी प्रशासनावर जोपर्यंत कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत शांत बसणार नसल्याचे आश्वासन देत यासंदर्भात आपण पोलीस आयुक्तांची भेट घेणार असल्याची माहिती यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

# अध्यक्षपदासाठी भाजपची शोधमोहीम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भाजपने आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात आक्रमक रणनीती उभारण्यास सुरुवात केली आहे. स्वबळावर महापालिका निवडणूक लढवण्याचा निर्धार स्पष्ट केल्यानंतर भाजपने तरुण कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवला आहे. महापालिका निवडणुकांची तारीख ठरली नसली तरी शहरात पक्षाची फेरमांडणी करण्यासाठी तरुणांची फळी तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.



ठाण्यात येत्या काही दिवसांत २० मंडळाच्या अध्यक्षपदासाठी तरुणांची नियुक्ती करण्यावर भाजपने भर दिला आहे. त्यातही हे तरुण ३५ ते ४५ वयोगटातील असतील, असेही भाजपच्या श्रेष्ठींनी स्पष्ट केले आहे. या तरुणफळीचा सर्वे सुरू करण्यात आला असून, येत्या काही दिवसांत त्यांची नियुक्ती केली जाणार असल्यामुळे तरुण अध्यक्षांसाठी शोधाशोध सुरू केले आहे.

भाजपचे ठाण्यात ३० मंडळ अध्यक्ष होते, परंतु आता ती संख्या २० वर आणण्यात आली आहे. यापूर्वी मंडळ अध्यक्षांना दोन दोन प्रभाग साभांळावे लागत असल्यामुळे त्यांची कसरत होत होती. परंतु आता एक एका प्रभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येणार आहे. यामुळे त्यांच्या कामाचा ताणही कमी होणार आहे. परंतु आता तरुण मंडळ अध्यक्ष येणार असल्याने त्यांच्या माध्यमातून प्रभागातील तरुणांपर्यंत जाण्याबरोबर भाजपचे ध्येय धोरण आणि केलेली विकासकामे हे पोहचविण्याचे महत्त्वाचे काम त्यांना करावे लागणार आहे. येत्या काही दिवसांत तरुण मंडळ अध्यक्षांची फळी उभी केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. भाजपने पालिकेत भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मंडळ अध्यक्षाबरोबर आता शहर अध्यक्ष देखील ४५ ते ५० वयोगटातील असावा याबाबत चर्चा सुरू झाली असून तसे झाल्यास पक्षातील नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे. तसेच आता भाजपमधील प्रत्येक माजी नगरसेवक आपले वय तपासू लागला असून आपण त्यात बसतो का? याची चाचपणी करू लागला आहे. परंतु जे या वयात बसणार नाहीत, ते आपोआपच शहर अध्यक्ष पदाच्या रेसमधून बाहेर फेकले जाणार आहेत.

# उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कल्याण पंचायत समितीला भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** सर्वसामान्य ग्रामस्थांच्या तक्रारी व अडचणींचे तातडीने निवारण व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेने १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत तालुका सुविधा समिती योजना राबवली आहे. या उपक्रमाअंतर्गत गुरुवारी (ता.१०) जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) अविनाश फडतरे यांनी कल्याण पंचायत समितीला भेट देत ग्रामस्थांच्या समस्या ऐकल्या अन् त्यांचे निराकरण केले. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या या उपक्रमानुसार भिवंडी, मुरबाड, शहापूर, अंबरनाथ आणि कल्याण या पंचायत समित्यांना वरिष्ठ अधिकारी भेटी देत आहेत. त्यानुसार अविनाश फडतरे यांनी कल्याणमध्ये ग्रामस्थ व अधिकाऱ्यांशी संवाद साधला. या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी उपस्थित खातेप्रमुख व कर्मचाऱ्यांना तालुका सुविधा समिती योजनेसंदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमात कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, सहाय्यक गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, बांधकाम उपअभियंता महाडिक, प्रभारी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. पूनम जयकर, पशुसंवर्धन अधिकारी धांडे तसेच विविध खात्यांचे अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# वन खात्याच्या सबलीकरणसाठी सरकार सकारात्मक - वनमंत्री गणेश नाईक


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर :** अर्थसंकल्पात वन विभागाला निधी मागण्याची गरज भासु नये यासाठी वन विभागात उत्पन्न वाढीसाठी विविध उपाययोजना करून वन खात्याचे सबलीकरण करण्यात येणार असून आगीवर नियंत्रणासाठी सर्वेतोपरी प्रयत्न करून वन्यजीवांचे संवर्धन करण्यावर भर देण्यात येईल, अशी ग्वाही वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. वन विभागाच्या दोन दिवसीय बैठकीसाठी नागपुरात आल्यानंतर वनमंत्री गणेश नाईक यांनी सेमिनरी हिल्स येथील हरिसींग सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, वन खात्याला आर्थिक बळ कसे मिळेल याबाबत नोट तयार करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सिझनल आणि रिजनल फळांच्या ज्युसमधून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यात कोकणात आंब्याचे, पश्चिम महाराष्ट्रात दाळींब, द्राक्षाचे ज्युस, मराठवाड्यात मोसंबी, विदर्भात संत्र्याचे ज्युस तयार करण्याचा विचार आहे. तसेच वन विभागाच्या ७०० नर्सरीत जांभुळ, फणस, आंबा आदींची झाडे लावण्यात येतील. तसेच कोकणातील सुरंगी फुलांचा गजरा खुप प्रसिद्ध असून सुरंगीची झाडे समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा लावण्यात येतील. पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांच्या सुविधेसाठी प्रत्येक गेटचे सुशोभिकरण, रेस्टॉरंट, शुद्ध पाणी, फाईव्ह स्टार हॉटेल आदींना परवानगी देण्याचा मानस असून वनखाते जनताभिमुख करण्यात येईल. चंद्रपूरमध्ये १० एकर जमिनीवर आधुनिक फर्निचर तयार व्हावे या माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रस्तावासाठी दर महिन्याला १० कोटी रुपये या प्रमाणे ७ महिन्यात ७० कोटी रुपये कॅम्पातून देण्यात येऊन असा प्रकल्प प्रत्येक प्रादेशिक विभागात उभारण्यात येईल. तसेच नाशिक आणि ठाणे येथील वन विकास महामंडळाच्या ६० हजार एकर जागेवर सोलर पार्क तयार करून वीज उत्पादन करण्यात येणार असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.




# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

'सर्वसाक्षी जगतप्ती।
त्याला नकोच मध्यस्ती।।'

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।
मतिविना नीती गेली।
नितीविना गती गेली ।
गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप विरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभंगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## वाशी येथील जगदंबा देवीच्या यात्रेत
# नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : तालुक्यात देवी देवतांच्या यात्रांना सुरूवात झाली असून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात यात्रा संपन्न होत आहेत. चैत्र शुद्ध चतुर्दशी शुक्रवार ११ एप्रिल रोजी वाशी येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री भवानी जगदंबा देवीची महायात्रा होत आहे. गुरुवार १० एप्रिल रोजी रात्र यात्रा दिवस तर शुक्रवारी ११ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजता श्रीची महाआरती सकाळी ८ वाजता काट्याचे वजन करून



नवस फेडणे, गळाला नवस फेडणे, देवाकाठ्या उभारणे तर दुपारी १२ वाजता पालखी सोहळा व नंतर लेपा मिरवणूक तसेच रात्री ९ वाजता श्री चा छबिना मंदिरातून निघून गावात फिरवण्यात येणार आहे असा कार्यक्रम श्री भवानी जगदंबा देवी देवस्थान वाशी यांच्या वतीने महायात्रा महोत्सवात आयोजित करण्यात येत असल्याने मोठ्या संख्येनेभाविकांनी देवीच्या दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज व पेशवे यांनीही पूर्वकाळात देवीचे दर्शन घेतले असल्याने हे पूर्वापार श्री भवानी देवीचे जागृत देवस्थान असल्याने मंदिरात नेहमीच देवीच्या दर्शनासाठी गर्दी होत असते. तुळजापूरची भवानी माता, कोल्हापूरची महालक्ष्मी, कार्ल्याची एकविरा देवी तसेच वाशीची वरसुआई म्हणजेच श्री जगदंबा अंबा भवानी देवीची महिती महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक माऊलींच्या दर्शनासाठी गर्दी करत असतात.गावक-यांचे सहकार्य गावपंचमंडळी व तक्षमी यांची देखरेख असल्याने कार्यक्रम सलग दोन दिवस चालत असतो .

## उन्हाच्या तडाख्यातून
# मुक्या जीवांची मुक्तता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उन्हाळयाचा तडाखा तर कधी वादळ-वारा यांसारख्या हवामानीय बदलांचा फटका मन्युष्यालाच नाही तर मुक्या जीवनासुद्धा बसत आहे. थंडावा किंवा पाण्याचा शोधात घोरपडीच्या पिल्लाने इंटीरियर डेकोरेटर दुकानात आसरा घेतला. कार्यालयातील एसीच्या थंड वातावरणात प्लास्टिकच्या खुर्चीत पिल्लू दडून बसलेले आढळले. सर्प मित्र दत्ता



बोंबे यांनी सदर पिल्लाची सुखरूप सुटका करून निसर्गमुक्त केले.

दुसऱ्या ठिकाणी आयत्या घरात घरोबा करणारी कोकिळ पक्षी ओळखला जातो. अशाच एका ठिकाणी कावळा पक्ष्याचा घरट्यात अंडी देण्यासाठी मादा कोकिळ आली असावी परंतू काही कारणास्तव तिच्या गळयाभोवती प्लास्टिक चा धागा गुंडाळला गेला तिच्या ओरडण्यामुळे अनेक कावळे तिला जिवानिशी मारू लागले. त्या आवाजाने स्थानिक रहिवासी संजय वाजपेयी कुटूंब बाहेर आले व त्यांनी कावळयांपासून त्या कोकिळेचे रक्षण करत सर्पमित्रांना बोलाविले. दत्ता बोंबे यांनी ४०-५० फूट उंच असलेल्या बदामाच्या झाडावर झुमरींग करत या कोकिळ पक्षाचा सुरक्षीत बचाव केला. तसेच रॅपलिंग करत खाली उतरले थोडक्यात गिर्यारोहण साहित्यांच्या आधारे कोकिळ पक्षाचा जीव वाचवून निसर्गमुक्त केलं. याप्रसंगी पक्षीमित्र नरेंद्र भिवंडीकर, प्रसाद देवरे यांनी सहकार्य केले.

# भिवंडी तालुका महासंघाच्या अध्यक्षपदी आत्माराम पाटील यांची नियुक्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : " महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार महासंघ" भिवंडी तालुका महासंघाच्या अध्यक्षपदी वेढेगावचे माजी-सरपंच आत्माराम रामा पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तालुक्यातील "माहिती अधिकार महासंघाचे " अध्यक्षपद रिक्त असल्यामुळे या पदाची नियुक्ती करण्यासाठी महासंघाचे



उपाध्यक्ष शंकर वडवले व जिल्हाध्यक्ष अशोक पडवळ यांच्या उपस्थितीत तालुका अध्यक्ष पदाची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली.यावेळेस महासंघाचे पदाधिकारी उपाध्यक्ष-नवसु पाटील,कार्याध्यक्ष-शामराव भोईर,सरचिटणीस-विजय गायकवाड,सचिव- दत्तात्रय पाटील,दशरथ पाटील व महासंघाचे सदस्य यांची आवर्जुन उपस्थिती होती.

यावेळेस शहापूर तालुका-महिला अध्यक्ष माया मगर,मुरबाड तालुका संपर्कप्रमुख-निलेश बांगर आदि मान्यवर उपस्थित होते.सदर सभेचे प्रास्ताविक सरचिटणीस-विजय गायकवाड यांनी तर सूत्रसंचालन व आभार कार्याध्यक्ष शामराव भोईर यांच्याकडून करण्यात आले.यावेळेस उपस्थित मान्यवर पदाधिकारी यांच्याकडून महासंघाच्या पदाधिकारी व सदस्य यांना बहुमोल मार्गदर्शन करण्यात आले,त्याचबरोबर महासंघाच्या वाढीसाठी जास्तीत-जास्त परिश्रम घ्यावेत अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# जग बदलत आहे, तर शिकवण्याची पद्धत देखील बदला

## - डॉ. दिनेश गुप्ता



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: "आजकाल कोणीही बग्गीमध्ये कामावर जात नाही. बटण-आधारित मोबाईलवरून, आपण अँड्रॉइड मोबाईलकडे, गुहांमधून अपार्टमेंटकडे, काळ्या आणि पांढऱ्या टेलिव्हिजनवरून आपण स्मार्ट टीव्हीकडे वळलो आहोत. जग बदलत आहे, विश्व बदलत आहे. मुलांकडेही स्मार्ट फोन आहेत, म्हणून आता आम्हा शिक्षकांनाही आपल्या शिकवण्याच्या पद्धती बदलाव्या लागतील." असे मत माइंडसेट गुरू प्रोफेसर डॉ. दिनेश गुप्ता यांनी व्यक्त केले. तारापूर विद्या मंदिरात शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

जीवनदीप पब्लिकेशन्सच्या सहकार्याने कौशल्य विकास आणि नवोपक्रम या विषयावरील विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सुमारे ४७ शिक्षकांसह इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. प्राचार्य जॉन, समन्वयक मनीषा चव्हाण आणि पर्यवेक्षक चौधरी यांच्या विशेष देखरेखीखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. हे तीन तासांचे विशेष सत्र होते, जे नवीन विकसित अध्यापन पद्धती, मानसिकता, विशेष प्रयोग, नावीन्यपूर्णता आणि समग्र विकासाने भरलेले होते.

## कल्याण ग्रामीण मधील कोसले येथे
# क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील कोसले येथे नुकताच आत्मा योजने अंतर्गत क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची प्रस्तावना कल्याण मंडळ कृषी अधिकारी भगवान पथारे यांनी केली. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत डॉक्टर नामदेव म्हसकर यांनी एकात्मिक



शेती पद्धती तसेच सेंद्रिय शेती विषयी मार्गदर्शन केले.

ठाणे प्रकल्प उपसंचालक आत्मा मनाली तांबडे यांनी नैसर्गिक शेती तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन जनजागृती कार्यक्रमाविषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक वैशाली भापसे यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले. कृषी सहाय्यक गेरसे प्रसाद भोकरे यांनी जीवामृत तयार करणे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्या नंतर पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेमध्ये सहभाग घेतलेल्या यशस्वी उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी कोसले सरपंच दिलीप पालवी, गेरसे सरपंच शरद दिवाणे, कृषी पर्यवेक्षक, खडवली विजय पाटील, पोलीस पाटील विलास पालवी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्रकल्प संचालक आत्मा ठाणे रामेश्वर पाचे व कल्याण तालुका कृषी अधिकारी कुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम पालवी, गोपाळ भोईर व कविता पारधी यांचे सहकार्य लाभले.

## ठाकरे सेनेच्या
# कल्याण शहर प्रमुख पदी बाळा परब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणमधील ज्येष्ठ शिवसैनिक, माजी परिवहन सदस्य कृष्णा उर्फ बाळा परब यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कल्याण शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मुख्यालयातून या नियुक्तीची घोषणा झाली असून बाळा परब यांची कल्याण पश्चिम विधानसभा शहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कल्याणच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवसेनेच्या मुख्य कार्यालयात बाळा परब यांनी पदभार स्विकारला. कल्याणकर शिवसैनिकांच्या प्रेमाने तसेच उपनेते विजय साळवी यांच्या सहकार्यामुळे आपली नियुक्ती झाल्याचे सांगत त्यांची सर्वांचे आभार मानले आहेत. कल्याण शहरात उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना झपाट्याने वाढविण्यासाठी आपण दिवसाचे चोविस तास प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# गीतासार



### अध्याय ७
## ज्ञानविज्ञानयोगः

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् । मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ ७-१३ ॥

गुणांचे कार्य असणाऱ्या सात्त्विक, राजस आणि तामस या तिन्ही प्रकारच्या भावांनी हे सारे जग-सजीवसमुदाय मोहित झाले आहे. त्यामुळे या तिन्ही गुणांच्या पलीकडे असणाऱ्या अविनाशी अशा मला ते ओळखत नाही. ॥ ७-१३ ॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ ७-१४ ॥ कारण ही अलौकिक अर्थात

अतिअद्भुत त्रिगुणात्मक माझी माया पार होण्यास फार कठीण आहे. परंतु जे केवळ मलाच निरंतर भजतात, ते या मायेला ओलांडून जातात, म्हणजे संसारातून तरून जातात. ॥ ७-१४ ॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः । माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ ७-१५ ॥

मायेने ज्यांचे ज्ञान हिरावून घेतले आहे, असे आसुरी स्वभावाचे, पुरुषांमध्ये नीच असणारे, दुष्ट कर्मे करणारे मूढ लोक मला भजत नाहीत. ॥ ७-१५ ॥

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन । आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ ७-१६ ॥

हे भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना, उत्तम कर्मे करणारे अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू आणि ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त मला भजतात. ॥ ७-१६ ॥

## रेसिपी
# मशरूम सूप



साहित्य
बटण मशरूम - 200 ग्रॅम
बटर - 2 चमचे
मध्यम आकाराचा बारीक चिरलेला कांदा - 1
लसूण पाकळया बारीक चिरलेल्या - 2 ते 3
मैदा - 1 टेबलस्पून
कुटलेली काळी मिरी - 5 ते 6
मशरूम स्टॉक
म्हशीचे दूध - 1 वाटी
हेवी क्रीम किंवा व्हीप्ड क्रीम - 2 टेबलस्पून
मीठ - चवीनुसार

कृती
मशरूम चांगले धुवा आणि त्यांचे लांब तुकडे करा. एक पॅन घ्या, त्यात चिरलेला लसूण व कांदा घाला आणि ढवळा. कांदे मऊ आणि पारदर्शक होईपर्यंत परतून घ्या.
आता पॅनमध्ये चिरलेले मशरूम घाला आणि तपकिरी होईपर्यंत तळा. जेव्हा त्यातील पाणी सुकू लागेल तेव्हा त्यात मैदा घाला.
पिठाचा कच्चा वास निघून जाईपर्यंत मंद आचेवर ढवळत राहा. आता त्यात कुटलेली काळी मिरी घाला आणि चांगले एकजीव करा.एक कप पाणी किंवा मशरूम स्टॉक घाला व चांगले मिक्स करा. त्यात दूध घाला आणि थोडा वेळ ढवळत राहा.नंतर मीठ घालून एकजीव करा.सूप घट्ट होईपर्यंत आणखी 4 ते 5 मिनिटे शिजवा. आता त्यात क्रीम घाला.गॅस बंद करा. एका भांड्यात काढा आणि वरून कोथिंबीर टाकून सर्व्ह करा.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

### ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालय येथे

# राष्ट्रीय संशोधन ई परिषदेचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कांदिवली :** आगामी राष्ट्रीय संशोधन परिषदेत सहभागी होण्यासाठी संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिकांसाठी कांदिवलीच्या ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालयाने 24 एप्रिल रोजी राष्ट्रीय संशोधन ई परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.या ई परिषदेचे उद्दिष्ट विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना एकत्र आणून त्यांचे संशोधन निष्कर्ष शेअर करणे, विचारांची देवाणघेवाण करणे आणि भारतातील अलीकडील घडामोडींवर चर्चा करणे हे आहे. कॉन्फरन्सची मुख्य थीम ट्रान्सफॉर्मिंग भारत: 21 व्या शतकात वाणिज्य, विज्ञान आणि Humanities यांची भूमिका अशी आहे. 24 एप्रिल 2025 रोजी ऑनलाइन पद्धतीने ही परिषद आयोजित केली जाईल. सामाजिक विज्ञान, भाषा, आदरातिथ्य अभ्यासापासून वाणिज्य, विज्ञान, गणित, माहिती तंत्रज्ञान, कॉम्प्युटर सायन्स, डेटा सायन्स या विषयांपर्यंत आंतर-विद्याशाखेतील उप-थीम दिलेली आहेत. निवडक शोधनिबंध पीअर रिव्ह्यूड जर्नल, स्कोपस आणि UGC CARE सूचीबद्ध जर्नलमध्ये प्रकाशित केले जातील. या ई कॉन्फरन्समध्ये प्राध्यापक, रिसर्च स्कॉलर, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होऊ शकतात. 21 एप्रिल 2025 पर्यंत तुमचा संपूर्ण रिसर्च पेपर सबमिट करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. जी. डी. गिरी व CEO श्री राजेश सिंग यांनी केले. या E परिषदेसाठी मुख्य अतिथी माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, जर्मनीच्या विप्रो प्रा. ली. चे कौशिक चौहान प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी, आपण श्री. हार्दिक गोराडीया 8097665698 आणि श्रीमती आभा धोटे 8407958510 यांच्याशी संपर्क साधू शकता. संशोधन लेख conference@tsdcmumbai.in या email वर पाठवावे.

# कामगार सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे काम अंतिम टप्प्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** ठाणे जिल्ह्यातील लाखो कामगाराना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी तब्बल 102 कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले सुपर स्पेशालिटी कामगार रुग्णालयाचे काम शेवटच्या टप्प्यात आले आहे. रुग्णालयाचे काम 90 टक्के पूर्ण झाले असून खासदार श्रीकांत शिंदे यांचे स्वप्न सत्यात उतरणार आहे.

उल्हासनगर कॅम्प 3 मधील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाच्या बाजूला कामगार रुग्णालय आहे. या कामगार रुग्णालयातून डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी आणि बदलापूर येथील औद्योगिक क्षेत्र आणि लहान मोठ्या कारखान्यातील सुमारे तीन लाख कामगारांना 1971 पासून आरोग्य सेवा पुरवली जात होती. 2015 मध्ये या रुग्णालयाची इमारत धोकादायक असल्याचा अहवाल मुंबई आयआयटीकडून देण्यात आला. तेव्हा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मोडकळीस आलेल्या, जर्जर झालेल्या धोकादायक इमारतीच्या जागी नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे रहावे



या रुग्णालयात 115 बेड असणार आहेत. 10 आयसीयू, 96 सर्वसाधारण, 6 आपत्कालीन बेड असतील. हे रुग्णालय संपूर्ण वातानुकूलित असून यंत्रणा लावण्यात आली आहे. फिजियोथेरेपी, आपत्कालीन ट्राम वॉर्ड, रेडिओलॉजी विभाग, आय.सी.यु., एन.आय.सी.यु., अल्ट्रासाऊंड आदी सुविधांनी सुसज्ज आहे.


ह्यासाठी केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा करून रुग्णालयासाठी 102 कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता.

100 बेडच्या या रुग्णालयाकरिता 2 लाख चौरस फुटांचे दोन मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यातील अंदाजे 1 लाख पेक्षा अधिक चौरस फूट क्षेत्र हे रुग्णालयाचे आहे. यासाठी केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किशन अवतार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अभियंता रणजीत बोटे, प्रकल्प व्यवस्थापक संजीव गुप्ता, कनिष्ठ अभियंता रोहित कुमार, बांधकाम व्यवस्थापक समीर पाटील यांच्या टीमने तीन वर्षात रुग्णालयाचे काम शेवटच्या टप्प्यात आणले आहे.

विशेष म्हणजे इमारतीच्या बांधकामात गंजरोधक लोखंडी सळयांचा वापर करण्यात आला आहे. इमारतीच्या तळ मजला तथा परिसरात आपत्कालीन विभाग, ओपीडी, स्वागत कक्ष, औषध दुकान, जनरेटर रूम, इलेक्ट्रिक रूम, शव विच्छेदन केंद्र, मलप्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण होत आले आहे. पहिल्या मजल्यावर सुसज्ज असे तीन ऑपरेशन थिएटर, डॉक्टर ओपीडी आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी प्रतीक्षा कक्ष उभारण्यात आला आहे. दुसऱ्या मजल्यावर रुग्णांचे विविध वॉर्ड आहेत. दुसऱ्या मजल्यापर्यंत पोहचविण्यासाठी पाच लिफ्ट आहेत. ह्या लिफ्टचे काम ही शेवटच्या टप्प्यात आहे.

या कामगार रुग्णालयात विविध वॉर्ड मध्ये मिळून 115 बेड असणार आहे. 10 आयसीयू, 96 सर्वसाधारण, 6 आपत्कालीन बेड असतील. हे रुग्णालय संपूर्ण वातानुकूलित असून यंत्रणा लावण्यात आली आहे. फिजियोथेरेपी, आपत्कालीन ट्राम वॉर्ड, रेडिओलॉजी विभाग, आय.सी.यु., एन.आय.सी.यु., अल्ट्रासाऊंड आदी सुविधांनी सुसज्ज आहे.

रुग्णालयात कार्यरत पूर्णवेळ डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी निवासी व्यवस्था करण्यात आली आहे. टाईप 3 मध्ये 16 सदनिका ह्या विकसित करण्यात आल्या आहेत. या सदनिका वर्ग 3 कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित आहेत. तर टाईप 4 मध्ये 14 सदनिका असून त्या वर्ग 2 च्या डॉक्टर्सना आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. दोन सदनिका ह्या जिल्हा शल्य चिकित्सक दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.




# अपात्र धारावीकरांचे पुनर्वसन होणार कुठे?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सुमारे २५६ एकर मिठागरांची जमीन देण्यास मंजुरी दिली आहे. ही जागा मुलुंड, कांजूरमार्ग आणि भांडूप परिसरात असून, या जमिनीवर 'अपात्र' धारावीवासियांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. पर्यावरणीय दृष्टीने काही जणांनी या प्रस्तावाला विरोध दर्शविला आहे. डीआरपीचे (धारावी पुनर्विकास प्रकल्प ) मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी याबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. ही सर्व जमीन पूर्व द्रुतगतीमार्गाच्या पश्चिमेला असून गेल्या अनेक वर्षांपासून समुद्र संपर्काबाहेर आहे आणि विकासासाठी पूर्णतः सुरक्षित आहे, असे एस. व्ही. आर. श्रीनिवास म्हणाले.

तसेच या जमिनींचा सॉल्ट कमिशनर ऑफ इंडिया यांच्याकडून अधिकृतरित्या मीठ उत्पादनासाठी वापर बंद करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ इथे मीठ उत्पादन झालेले नाही. पूर्व द्रुतगतीमार्ग झाल्यानंतर समुद्राचे पाणी या भागात पोहोचलेले नाही. त्यामुळे येथे स्वस्त गृहप्रकल्प उभारणे कोणत्याही प्रकारे धोकादायक नाही," असे



श्रीनिवास यांनी स्पष्ट केले आहे. तर या जमिनी सीआरझेड (सागरी किनारा नियमन क्षेत्र) क्षेत्रात येत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**महाराष्ट्र सरकारने धारावी पुनर्विकासासाठी सुमारे २५६ एकर मिठागार जमीन मंजूर केली आहे. ही जमीन मुलुंड, कांजूरमार्ग आणि भांडूप परिसरात आहे आणि 'अपात्र' धारावीवासियांच्या पुनर्वसनासाठी वापरण्यात येईल.**

### कायदेशीर प्रक्रियांचे काटेकोर पालन

"खाडी व जलमार्गांत स्थलांतरित पक्षी, उदा. फ्लेमिंगो येतात, ते क्षेत्र पूर्वेकडे आहे. आपल्याकडे असलेल्या जमिनी पश्चिमेकडे असून, त्या ना जलमार्गाजवळ आहेत, ना पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येतात. त्यामुळे कोणत्याही प्रकल्प संदर्भातील बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सर्व आवश्यक पर्यावरणीय मंजुरी घेण्यात येईल. सर्व कायदेशीर प्रक्रियांचे काटेकोर पालन केले जाईल," असे श्रीनिवास यांनी आवर्जून नमूद केले.

### सॉल्टपॅन जमीन न वापरता मुंबईचा पुनर्विकास शक्य नाही

विकास आराखडा २०३४ अंतर्गत या जमिनी स्वस्त घरे बांधण्यासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. २०१८ मध्ये हा आराखडा मंजूर झाला आहे. यावेळी महानगरपालिकेत आणि राज्य सरकारमध्ये एकत्रित शिवसेना (एकनाथ शिंदे गट आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे गट) सत्तेत होती. यापूर्वी २००७ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारनेही २,००० हेक्टर सॉल्टपॅन जमिनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वापरण्याचा प्रस्ताव ठेवला होता. मुंबई विकास आराखड्यानुसार १० लाख स्वस्त घरे आवश्यक आहेत, त्यापैकी ३.५ लाख घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आहेत. तर यासाठी "सॉल्टपॅन जमीन न वापरता मुंबईचा पुनर्विकास शक्य नाही," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

### तेव्हा गरिबांसाठी घरे बांधणे गैर का?

सध्या केंद्रीय उत्पादन शुल्क व सीमाशुल्क विभाग वडाळ्यात ५५ एकर सॉल्टपॅन जमिनीवर कार्यालय व कर्मचारी निवास उभारत आहे. तसेच कांजूरमार्गमधील १५ एकर सॉल्टपॅन जमीन मेट्रो लाईन ६ (विक्रोळी ते स्वामी समर्थ नगर/ लोखंडवाला कॉम्प्लेक्स) साठी दिली आहे. तर विशेष म्हणजे, मागील महाविकास आघाडी सरकारनेही कांजूरमधील याच मिठागरांच्या जमिनीचा वापर मेट्रोच्या चार मार्गांसाठी एकत्रित कारशेड उभारण्यासाठी करण्याचा प्रस्ताव दिला होता. या कारशेडमध्ये मेट्रो लाईन ३ (कोलाबा ते सीप्झ), लाईन ४ (कसारवडवली ते वडाळा), लाईन ६ आणि लाईन १४ (कांजूर ते अंबरनाथ) या मार्गांचा समावेश होता.

याच पार्श्वभूमीवर डीआरपी चे भागीदार असलेल्या एनएमडीपीएल संस्थेच्या प्रवक्त्यानी स्पष्ट केले की, "जेव्हा मेट्रो कारशेडसाठी सॉल्टपॅन जमीन वापरणे योग्य मानले गेले, तेव्हा गरिबांसाठी घरे बांधणे गैर का?" त्यामुळे "सॉल्टपॅन जमिनीच्या विरोधात बोलणाऱ्यांना मुंबईच्या भविष्यासाठी दूरदृष्टी नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

# आता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक एसटी महामंडळाचे अध्यक्ष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** एसटी महामंडळाची एकीकडे आर्थिक कोंडी सुरु असल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असताना आता एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची नियुक्ती एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर केली होती. त्यामुळे



राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे फक्त नावापुरतंच परिवहन खातं राहणार अशी चर्चाही जोर धरू लागली होती. नंतर मुख्यमंत्र्यांनी एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा निर्णय मागे घेतला होता. आता एसटी महामंडळावर अधिकृतपणे परिवहनमंत्री प्रताप सरनाईकच राहणार असल्याचा शिक्कामोर्तब झालाय.

महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची "लोकवाहिनी" असलेल्या एसटीला भविष्यात आर्थिक दृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले आहेत. तसेच आपल्याला या पदावर नियुक्त करून महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

### परिवहनमंत्रीच एसटी महामंडळाचे अध्यक्ष

1960 मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी महामंडळ) स्थापना करण्यात आली. र.गो.सरैय्या हे महामंडळाचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर अनेक महत्त्वाच्या व्यक्तींनी एसटी महामंडळाचे अध्यक्षपद भूषविले आहे. प्रताप सरनाईक हे एसटी महामंडळाचे 26 वे अध्यक्ष असणारं आहेत. 2014 ते 2019 मध्ये दिवाकर रावते हे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात अनिल परब यांच्याकडे मंत्रिपदची आणि अध्यक्षपदाची जबाबदारी होती. हीच परंपरा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना कायम ठेवण्यात आली. त्यावेळी एकनाथ शिंदे हेच राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी या परंपरेला ब्रेक दिला होता. आता शिंदे गटाचे मंत्रीच एसटी महामंडळावर पुन्हा कायम ठेवण्यात आल्याने चर्चांना पूर्णविराम मिळालाय.



# अक्षय शिंदेचे पालक दीड महिन्यापासून बेपत्ता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : बदलापूरमधील शाळेतील चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचे कथित एन्काऊंटर झाले. आता अक्षय शिंदेच्या एन्काउंटर प्रकरणात नवे वळण आले आहे. अक्षय शिंदे याचे पालक गेल्या दीड महिन्यापासून बेपत्ता असून ते वकिलांच्याही संपर्काबाहेर असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे खळबळ माजली हे. बदलापूर अल्पवयीन विद्यार्थिनींवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काउंटरची एसआयटी चौकशीचे आदेश न्यायालयाने दिले होते. मात्र या आदेशानंतर अक्षयचे पालक अचानक संपर्काबाहेर गेले असून, त्यांचे घर कुलूपबंद आढळल्याची माहिती समोर आली आहे. अंबरनाथमध्ये मावशीकडे वास्तव्यास असलेले अक्षय शिंदे याचे पालक तेथूनही निघून गेले आहेत, असेही उघड झाले आहे. अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात न्यायालयात दाद मागण्यासाठी शिंदे यांच्या पालकांनी वकील अमित कटरनवरे यांची नेमणूक केली होती. मात्र, केस लढण्याची इच्छा नसल्याचे कोर्टात सांगितल्यानंतर आता पालक त्या वकिलांच्याही संपर्कात नाहीयेत. गेल्या तब्बल दीड महिन्यांपासून शिंदे याचे पालक कुठे आहेत याची कोणालाही माहिती नाही, ते नेमके कुठे गेले, कसे आहेत, याची कोणालाच काहीही कल्पना नाही. त्यामुळे आता हे प्रकरण पुन्हा चर्चेत आलं आहे.

# जिल्हा परिषद मायणी शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्हा परिषदेच्या पेण तालुक्यातील मायणी कोयना शाळेत हॅन्ड इन हॅन्ड सामाजिक संस्था पुणे यांच्या सौजन्याने 50 लिटर क्षमतेचा केंट आरो वॉटर प्लांट देण्यात आला असून. त्यासोबतच पाचशे लिटर पाण्याची टाकी, 100 लिटर स्टोरेज टाकी व मोटार असेही साहित्य देण्यात आलेआहे.

शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार असल्यामुळे सर्व विद्यार्थी आनंदी झाले असून शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था केल्याबद्दल हॅन्ड इन हॅन्ड संस्थेचे संचालक व सर्व टीमचे आभार मानले.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त

# अमित शहा रायगडावर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 345 व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने शनिवार 12 एप्रिल 2025 रोजी रायगड किल्ल्यावर सकाळी 11.00 वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राजदरबारात श्री शिवप्रतिमा पूजन, सैन्यदल अधिकारी आणि सरदार घराणे सन्मान, गडरोहण स्पर्धा बक्षिस वितरण सोहळा, श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार वितरण, शिवरायमुद्रा स्मरणिका प्रकाशन असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री श्री. अमित शाह हे उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास अनेक मंत्री, खासदार व आमदार उपस्थित राहून अभिवादन करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री श्री शहा सकाळी 11 वा रायगड येथे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात श्री शिवपुष्पस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच सैन्यदल अधिकारी ले.जन. संजय कुलकर्णी यांचा सन्मान व सरदार घराणे सन्मान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज उदयसिंगजी होळकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

### गृहमंत्री अमित शहा यांचा रायगड दौरा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्य तिथी सोहळयास शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे रायगड जिल्हा दौऱ्यावर आहेत. दौऱ्यात रायगड जिल्ह्यातील किल्ले रायगड व सुतारवाडी येथे केंद्रीय गृहमंत्री शहा भेट देणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सुरक्षा कारणास्तव सकाळी ७ ते दुपारी ४ या वेळेत २ कि.मी. परिसरात ड्रोन, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅंडग्लायडर्स इत्यादींच्या वापरावर बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येणार येईल असे जिल्हाधिकारी जावळे यांनी कळविले आहे.

# कल्याण ग्रामीणमध्ये फिरते पोलीस स्टेशन

## जनतेच्या तक्रारींना मिळणार न्याय



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. धोंडोपंत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुका पोलीस ठाण्याच्या ग्रामीण भागासाठी फिरते पोलीस स्टेशन (डिजीटल व्हॅन) हा अभिनव व अनोखा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. टिटवाळा येथे देखील या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. कल्याण तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा, आश्रम शाळा, कॉलेज, गुरवली (आदिवासी वाडी), मांडा टिटवाळा, वासूंद्री, गणपती मंदिर (टिटवाळा) व निमकर नाका अशा ठिकाणी भेट घेऊन त्यांना फिरते डिजिटल व्हॅन पोलीस स्टेशन तयार केले आहे तसेच डिजिटल व्हॅन बाबत मार्गदर्शन देण्यात आले.

या महत्वाकांक्षी उपक्रमाच्या मुख्य उदेश म्हणजे पोलीस सेवा अधिक लोकाभिमुख करणे व नागरीकांमध्ये कायदयाची जागरुकता वाढविणे, तसेच थेट जनते पर्यंत पोहचून त्यांच्या तक्रारी ऐकणे आणि त्यांचे त्वरीत निराकरण करणे हा होय. तसेच या अभिनव कार्यक्रमांद्वारे उप विभागीय पोलीस अधिकारी जगदीश शिंदे व कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्या नेतृत्वाखाली कल्याण पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांचे पथक गावोगावी जाऊन नागरीकांशी थेट संवाद साधत आहेत.

नवीन कायदयाची माहिती, सुरक्षा बाबत मार्गदर्शन तसेच जनजागृतीसाठी विविध माहिती पथ चित्रफिथ दाखविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे या कार्याक्रमांत नागीरीकांच्या तक्रारी त्याच्या घरी जाऊन ऐकल्या जात आहेत. तसेच त्यावर तात्काळ उपाययोजना केल्या गेल्या जात आहेत. पोलीसांविषयी अधिक विश्वास वाढाला असुन कल्याण ग्रामीण भागातील नागरीकांनी या उपक्रमांचे कौतुक करत, स्वागत केले आहे.

या फिरते डिजिटल पोलिस स्टेशन गाडी मधून साखळी चोरी, बाल लेंगिक शोषण, सोशल मिडीयाचा वापर कसा करायचा, जर कोणी मुलीची छेड काढली तर तिला मदत कशी करायची, ट्रॅफिक नियमाचे पालन कसे करायचे, आदिवासी पाडे, विट भट्टीवर काम करणाऱ्या मजूरांची भेट घेऊन त्यांना काही त्रास आहे काय ? आणि असेल तर डिजिटल व्हॅन अंतर्गत त्यांची तात्काळ तक्रार नोंदवून तिचे तात्काळ निरसन करणे असा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

हा उल्लेखनीय उपक्रम कल्याण ग्रामीण भागातील नागरीकांमध्ये विश्वास निर्माण करणारा आणि पोलीस व जनते मधील संबंध अधिक बळकट करणारा ठरत आहे. कल्याण तालुक्यातील नागरीकांनीही या उपक्रमाचे भरभरुन कौतुक केले असून त्यांचे प्रतिक्रीया अंत्यत सकारत्मक ऐकायला मिळत आहेत. पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण डॉ. डी. स्वामी यांनी डिजीटल फिरते पोलिस ठाण्याच्या गाडीतील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या कामगीरी बद्दल आनंद व्यक्त केलेला आहे.

# मुरबाड पंचायत समिती गटात रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे सुरू



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्टयात व मुरबाड शहर परिसरात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पंचायत समिती मुरबाड मार्फत जवळपास १५७४ कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत.

सदरची कामे ही मुरबाड पंचायत समिती गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहेत. चालू आठवड्यात २६५ कामे सुरू असून चालू आठवड्यातील साप्ताहिक कामावर ५१७२ मजूर उपस्थित होते.

यामध्ये सिंचन विहिरी, फलबाग लागवड,गोठा शेठ, पोल्ट्री शेड, घरकुल, रस्ते इत्यादी कामे सुरू आहेत परंतु यंदा सन २०२५ शासनाचा मजुरीचा दर ३१२/रुपये एवढा आहे तर मागच्या वर्षी मजुरीचा दर २९७/ रुपये एवढा होता म्हणजेच यंदा शासनाने फक्त १५रुपये मजुरीच्या दरात वाढ केली आहे. तीन महिन्यापासून मजुराच्या खात्यात पेमेंट जमा होत नाही अशी खंत मजूर बबन कृष्णा विशे (गाव-वाघिवली) यांनी व्यक्त केली आहे.

त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात मजुरांच्या हाताला काम मिळावं त्यामुळे खऱ्या अर्थाने मजुरीचा दर शासनाने व वाढवला तर मुरबाड तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ज्या ज्या ठिकाणी कामे चालू आहेत त्या ठिकाणी शासनाचा मजुरीचा दर कमी असल्याने अखेर मजूरदारांनी नाराजी व्यक्त केली आहे तरी सरकार मायबाप यांनी रोजगार हमी कामे चालू करताना शासकीय मजुरीचा दर किमान पाचशे रुपये वाढवावा अशी मागणी मजूरदारांनी केली आहे.

# रिक्षाचालकांचा आरटीओच्या गाडीला घेराव



**वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहील. डोंबिवली आरटीओची गाडी रिक्षाचालकांनी अडवली असली तरी कारवाई सूरूच होती. आरटीओकडून कारवाईत सातत्य राहील.**
**– आरटीओ, कल्याण अधिकारी,आशुतोष बारकुले**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : नियमांचे पालन न करणाऱ्या दुचाकी, चारचाकी आणि रिक्षाचालक यांच्यावर कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभाग ( आरटीओ) बुधवार 7 तारखेला सायंकाळच्या सुमारास डोंबिवलीत कारवाई सुरु होती. डोंबिवली पूर्वेकडील इंदिरा चौकात आरटीओचे अधिकारी कारवाई करता आले असता कारवाईला विरोध करत संतापलेल्या रिक्षाचालकांनी त्यांची गाडी अडवली. काही वेळ या ठिकाण वाहनाची लांब लांब रांगा लागल्याने वाहतूक कोंडी झाली होती. रिक्षाचालकांनी कारवाई नको अशी भूमिका घेतली होती तर आरटीओ अधिकाऱ्यांनी मात्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले.

डोंबिवलीतील वाहतूक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील हे स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहतूक व्यवस्थेकडे लक्ष देतात. तर डोंबिवली वाहतूक पोलीस व उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाई केली जाते.नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर बुधवारी आरटीओने डोंबिवलीतील कारवाई केली. मात्र काही रिक्षाचालकांनी चक्क इंदिरा चौकात आरटीओची गाडीची रोखली.

### कारवाई करू नये म्हणून गाडीला घेराव

कारवाई करू नका, दंड आकारू नका, आमची जगायचे कसे?, आधीच कर्ज त्यात दंड मग कस पोट भरणार असा प्रश्न रिक्षाचालकांनी यावेळी उपस्थित केला. मात्र नियम पाळा कारवाई होणार नाही असे आरटीओ अधिकाऱ्यांनी रिक्षाचालकांना सांगितले. याबाबत MH 05 वाहतूक प्रवासी संघटना संस्थापक अध्यक्षा वंदना सिंह सोनावणे म्हणाल्या, रिक्षाचालकांची दादागिरी व मुजोरीमुळे, प्रवासी कित्येक वर्ष त्रासलेले आहेत. आज तो त्रास आरटोओला झाला आहे त्यावरून डोंबिवली शहरातील वाहतूक व्यवस्थेची थोडी कल्पना आली असावी.आम्ही नेहमी आरटीओ आणि प्रशासन कडे मागणी केली आहे की, कायदे आहेत तर त्यांची कडक अंमलबजावणी करा आणि यांना शिस्त लावा. आम्हाला पर्यायी ट्रान्सपोर्ट व्यवस्था उपलब्ध करून द्या. EV बसची मागणी करत करत 8 वर्षात 50 EV रस्त्यावर आल्या पण आम्हाला दिसल्या नाहीत. 250 ची हमी होती आता 250 एक बस कधी येतील देव जाणे. तर जो पर्यंत कायद्यांची अमलबजावणी, पर्यायी ट्रान्सपोर्ट व्यवस्था उपलब्ध होणार नाही असे दिसते. डोंबिवलीत परिस्थिती चिघळतच राहणार कधी प्रवाश्यांना त्रास तर कधी अधिकाऱ्यांना त्रास होणार. बरं सगळेच ऑटो वाले वाईट वागतात अस नाहीत पण जे वागतात त्या त्या रिक्षाचालकांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलतो.

# देशी बनावटीचे पिस्तूल बाळगल्या प्रकरणी एकाला अटक

## कल्याण क्राईम ब्रँच ची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणात देशी बानवटीचे पिस्तुल घेऊन फिरणाऱ्या एका आरोपीला कल्याण क्राईम ब्रॅन्च पोलिसांनी अटक केली आहे. कल्याणाच्या नेतीवली चक्कीनाका परिसरात एक इसम देशी बनावटीच्या पिस्तूल व काडतुसे बाळगत असल्याची माहिती कल्याण क्राईम ब्रॅंचला मिळाली होती.या माहितीच्या आधारे कल्याण क्राईम ब्रॅंच च्या पथकाने सापळा रचत एका तरुणाला बेड्या ठोकल्यात बिंदास म्हात्रे असे या तरुणाचे नाव असून त्याच्या घरातून एक देशी बनावटीचे पिस्तुल, मॅगझिन, दोन जिवंत काडतूस आणि एक काडतुसाची पुंगळी असा 62 हजारांचा शस्त्रसाठा जप्त केला आहे. याप्रकरणी बिंदास म्हात्रे विरोधात कोळशेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने हे पिस्तूल कुठून व कशासाठी आणले होते याचा तपास पोलीस करत आहेत.

# राष्ट्रीय भूमापन दिन उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज १० एप्रिल रोजी राष्ट्रीय भूमापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच दिवशी, १० एप्रिल १८०२ रोजी भारतात भूमापनाच्या पहिल्या आधाररेषेची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि 'ग्रेट ट्रिग्नोमेट्रिक सर्वे'ची सुरुवात झाली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ देशभरात हा दिवस राष्ट्रीय भूमापन दिन म्हणून ओळखला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय पोलीस सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी श्री. सुरिंदर सिंग यांच्या शुभहस्ते आणि भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक श्री.महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली दीपप्रज्वलन आणि मोजणी साहित्याच्या पूजनाने झाली.

याप्रसंगी व्यावसायिक श्री. संदीप बिंद्रा आणि जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. बाबासाहेब रेडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

भूमापन दिनाच्या या विशेष सोहळयाचे औचित्य साधून, भूमी अभिलेख खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी आणि मागील वर्षी उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. सुरिंदर सिंग यांनी भूमी अभिलेख खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'नमक, नाम आणि निशाण' यांच्याशी निष्ठा राखत सेवा करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात श्री. महेश इंगळे यांनी भूमी अभिलेख खात्यातील सकारात्मक बदलांना प्रतिसाद देत अधिकाधिक जनसामान्याभिमुख सेवा देण्यावर भर दिला. विभागाच्या सर्व ऑनलाईन सुविधा जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून त्यांची कामे त्वरित कशी पूर्ण करता येतील याकडे लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात श्री. बाबासाहेब रेडेकर आणि श्री. संदीप बिंद्रा यांनीही उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबोधित केले. हास्य प्रबोधनकार श्री. सुहास जोशी यांच्या विनोदी शैलीतील मार्गदर्शनाने उपस्थितांना ताण-तणावापासून मुक्त राहून आनंदी राहण्याचे महत्त्व पटवून देत मनोरंजनाची पर्वणी साधली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उपअधीक्षक भूमी अभिलेख, अंबरनाथ श्रीमती सुवर्णा पाटील यांनी केले, तर नगर मापन अधिकारी, ठाणे, श्री. सिद्धेश्वर घुले यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# तुळई- कलंबाड जलजीवन पाणी योजनेचा बोजवारा

## भ्रष्ट दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची ग्रामस्थांची मागणी!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तुळई -कलंबाड टंचाई ग्रस्थ गावकऱ्यांना स्वच्छ मुबलक पाणी मिळणे करिता १ कोटी ८६ लाखाची जलजीवन योजना मंजूर होऊन सन २०२३ मध्ये या योजनेची पूर्णत्वाची मुदतही निघून गेली परंतु अजूनही सदर योजना संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विहीर खोदकाम अपूर्ण,टाकी बांधकाम अर्धवट,अपूर्ण पॉवर हाऊस ,अपूर्ण गावंतर्गत पाईप लाईन , निकृष्ठ अर्धवट मेन लाईन,फिल्टर व विजकरण न करता अर्धवट अवस्थेत, निकृष्ठ दर्जाचे काम केले आहे.

या संदर्भात महिला प्रतिष्ठान संस्थापक व शिवसेना शिव उद्योग सेना उपजिल्हाप्रमुख बाळा चौधरी व पत्रकार सुभाष जाधव तसेच ग्रामस्थ मंडळ,तुळई, कलंबाड बचत गट महिला भगीनेने वारंवार अनेकवेळा लेखी पत्र देऊनही अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही न केल्याने संतप्त महिला भगिनी ग्रामस्थ यांनी गटविकास अधिकारी कार्यालय पंचायत समिती मुरबाड येथे उपस्थित असणारे,जि. प.ठाणे उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांना निवेदनाची प्रत देऊन या योजनेत जाणीवपूर्वक हलगर्जी करणारे संबंधित अधिकारी याच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी...म्हणून आंदोलन करण्यात आले

सदर आंदोलनात उपमुख्यकार्यकरी अधिकारी श्री पवार यांनी उद्या लगेचच तातडीने चौकशी करून पंचनामा करण्याचे आदेश संबंधित पाणी पुरवठा अधिकारी यांना दिले. व गटविकास अधिकारी यांनी या सात दिवसात चौकशी करून दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचं लेखी पत्र देखील दिले.

सदर आंदोलनात शिवसेना तालुका प्रमुख संतोष विशे,मा.सभापती स्वरा चौधरी,माहिती अधिकार प्रमुख शंकर वडवले, रिपाई अध्यक्ष दिनेश उघडे,सरपंच कविता चौधरी,सदस्य भला,मा.उपसरपंच शुक्रचार्य जाधव,संतोष चौधरी,प्रमोद साबळे, ऋषिकेश चौधरी,विलास चौधरी,अविनाश चौधरी,दत्ता जाधव,धनाजी चौधरी,आल्या शिरोसे,देवांग रांजणे,व कलंबाड तुळई बचत गट महिला भगिनी उपस्थित होत्या. दोषीवर कारवाई व पाणी योजना पूर्ण न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा उपस्थित गावकरी यांनी दिला आहे.

# राष्ट्रीय भूमापन दिन उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज १० एप्रिल रोजी राष्ट्रीय भूमापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच दिवशी, १० एप्रिल १८०२ रोजी भारतात भूमापनाच्या पहिल्या आधाररेषेची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि 'ग्रेट ट्रिग्नोमेट्रिक सर्वे'ची सुरुवात झाली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ देशभरात हा दिवस राष्ट्रीय भूमापन दिन म्हणून ओळखला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय पोलीस सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी श्री. सुरिंदर सिंग यांच्या शुभहस्ते आणि भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक श्री.महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली दीपप्रज्वलन आणि मोजणी साहित्याच्या पूजनाने झाली.

याप्रसंगी व्यावसायिक श्री. संदीप बिंद्रा आणि जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. बाबासाहेब रेडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

भूमापन दिनाच्या या विशेष सोहळयाचे औचित्य साधून, भूमी अभिलेख खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी आणि



मागील वर्षी उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. सुरिंदर सिंग यांनी भूमी अभिलेख खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'नमक, नाम आणि निशाण' यांच्याशी निष्ठा राखत सेवा करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात श्री. महेश इंगळे यांनी भूमी अभिलेख खात्यातील सकारात्मक बदलांना प्रतिसाद देत अधिकाधिक जनसामान्याभिमुख सेवा देण्यावर भर दिला. विभागाच्या सर्व ऑनलाईन सुविधा जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून त्यांची कामे त्वरित कशी पूर्ण करता येतील याकडे लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात श्री. बाबासाहेब रेडेकर आणि श्री. संदीप बिंद्रा यांनीही उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संबोधित केले. हास्य प्रबोधनकार श्री. सुहास जोशी यांच्या विनोदी शैलीतील मार्गदर्शनाने उपस्थितांना ताण-तणावापासून मुक्त राहून आनंदी राहण्याचे महत्त्व पटवून देत मनोरंजनाची पर्वणी साधली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उपअधीक्षक भूमी अभिलेख, अंबरनाथ श्रीमती सुवर्णा पाटील यांनी केले, तर नगर मापन अधिकारी, ठाणे, श्री. सिद्धेश्वर घुले यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024